ज्ञानपथ बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक परिचर्या महाविद्यालय, १२०/२ के, अशोकवन, एन.एच.०७, वर्धा रोड, पोस्ट रूई, ता.जि.नागपूर.

---

नवीन एम.एस्सी. (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक.एनयुआर १४२२/प्र.क्र.३१६/२२/शिक्षण-२
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालयाचो नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१
दिनांक:- २९/०३/२०२३

**संदर्भ** :- १) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र.DMER-११०१५/६/२०२२/CETIT, दि. १८/०८/२०२२.
२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/पीबी/युजी/पीजी/१३१९/२०२१, दिनांक २९/१२/२०२१

**प्रस्तावना** :- ज्ञानपथ बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक परिचर्या महाविद्यालय, १२०/२ के, अशोकवन, एन.एच.०७, वर्धा रोड, पोस्ट रूई, ता.जि.नागपूर या संस्थेत एम.एस्सी. (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे M.Sc. (Obstetrics & Gynaecological Nursing), M.Sc. (Medical Surgical Nursing), M.Sc. (Child Health Nursing), M.Sc. (Mental Health Nursing) व M.Sc. (Community Health Nursing) हे ५ अभ्यासक्रम प्रत्येकी ०६ विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह नव्याने सुरू करण्याचा प्रस्तावाची संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून शासनास शिफारस प्राप्त झाली होती. त्यानुसार सक्षमता तपासणी करुन संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये संचालनालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने एम.एस्सी. (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे उक्त ५ अभ्यासक्रम सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- ज्ञानपथ बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक परिचर्या महाविद्यालय, १२०/२ के, अशोकवन, एन.एच.०७, वर्धा रोड, पोस्ट रूई, ता.जि.नागपूर या संस्थेस सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून पुढीलप्रमाणे एम.एस्सी (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे ५ अभ्यासक्रम त्यापुढे दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरू करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अभ्यासक्रम/विषय | प्रवेशक्षमता |
|---|---|
| M.Sc. (Obstetrics & Gynaecological Nursing) | ०६ |
| M.Sc. (Medical Surgical Nursing) | ०६ |
| M.Sc. (Child Health Nursing) | ०६ |
| M.Sc. (Mental Health Nursing) | ०६ |
| M.Sc. (Community Health Nursing) | ०६ |

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१) सदरहू महाविद्यालयातील उक्त एम.एस्सी. नर्सिंग पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेशक्षमता प्रत्येकी०६ विद्यार्थी इतकीच राहिल.

२) राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

आ.क्र. ४५९ २८/०४/२०२३ Received

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

४) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, भारतीय परिचर्या परिषद व राज्य शासन यांनी नर्सिंग अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६ मधील) तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करता येणार नाही.

७) शासकीय वैद्यकीय/नर्सिंग किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकांस तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमते पेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

९) संस्थेने गुणवत्तेनुसार आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१०) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

११) संस्थेने उपरोक्त नर्सिंग महाविद्यालयातील प्रवेश सुरु करण्यापूर्वी संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

३. सदर आदेश हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अजित सासुलकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
११. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
१३. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१४. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
१५. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
१६. प्राचार्य, ज्ञानपथ बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक परिचर्या महाविद्यालय, १२०/२ के, अशोकवन, एन.एच.०७, वर्धा रोड, पोस्ट रूई, ता.जि.नागपूर
१७. निवडनस्ती (शिक्षण-२)

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.